# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in

अतितात्काळ

इमेलव्दारे

क्रमांक : तशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०११/24

दिनांक : - 3 JAN 2012

प्रति,

———————————

———————————

———————————

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:— **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०११–१२**

शैक्षणिक वर्ष २०११–१२ मध्ये आपल्या संस्थेतील प्रवेशित व पात्र विद्यार्थ्यांना ई.बी.सी. मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक **२१/०१/२०१२** पर्यंत खास प्रतिनिधीमार्फत खालील मुददयांप्रमाणे तपासणी करुन या कार्यालयास सादर करावे.

१. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी हा CAP व्दारे प्रवेशित असून खुल्या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे **(ACAP व Institute Level व्दारे प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करु नये)**.

२. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १ लक्ष रकमेच्या आत असणे आवश्यक आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांकडून आर्थिक **वर्ष २०१०–११ चे उत्पन्न प्रमाणपत्र** संबंधीत तहसिलदार, नायब तहसिलदार किंवा उपजिल्हाधिकारी यांचेव्दारे निर्गमित केलेले असावे.

३. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करतांना विहित नमुन्यात **वर्षनिहाय, अभ्यासक्रम निहाय** विद्यार्थ्यांची यादी **हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉफी (पेन ड्राईव्ह / सीडी मध्ये)** सादर करावी, त्याशिवाय आपल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सदर यादी ही **Microsoft Excel Format (Excel 2003) मध्ये Times New Roman** या फॉन्टमध्येच सादर करावी.

४. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करतांना प्रत्येक विद्यार्थ्यांनी कॅप व्दारे प्रवेशाचे Allotment Letter/ Admission Confirm Letter जोडले आवश्यक आहे किंवा या कार्यालयाव्दारे तसेच DTE व्दारे प्रमाणित केलेली गुणवत्ता यादीची सांक्षाकित प्रत पात्र विद्यार्थ्यांचे नांव Highlighted करुन प्रस्तावासोबत जोडावी.

५. प्रस्तावासोबत आपल्या संस्थेच्या बॅंक खात्याची बिनचुक माहिती विहित नमुन्यात बॅकेव्दारे प्रमाणित करुन सोबत जोडावी.

६. पात्र विद्यार्थी हा मागिल परीक्षा उत्तीर्ण/एटीकेटी असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७. प्रस्तावासोबत शै.वर्ष २०१०–११ मध्ये ई.बी.सी. मंजूर विद्यार्थ्यांच्या यादीची छायांकित प्रत जोडावी.

८. ईबीसी प्रस्तावाकरीता आवश्यक असलेले विहित अर्ज/प्रपत्र या कार्यालयाच्या (www.rdtenagpur.org.in) संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्याच नमुन्यात अर्ज व विहीत माहिती सादर करावी.

वरील बाबींची पुर्तता करुनच आपल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयात सादर करावे. त्याशिवाय आपले संस्थेचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

E:\Meshram\EBC\EBC-2011-12 Main Folder\EBC General Letter.doc